दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १९४ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार, दि.१९ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क




# ‘जवानांच्या समर्पित सेवेमुळेच देश सुरक्षित’
# आ.सुधीर मुनगंटीवार यांचे गौरवोद्गार

## भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ बल्लारपुरात सात किमी तिरंगा यात्रेत उसळला देशभक्तीचा जनसागर

## ’भारत माता की जय’ आणि ’वंदे मातरम’ जयघोषाने दुमदुमले बल्लारपूर शहर





**बल्लारपूर । प्रतिनिधी**

देशाच्या सुरक्षेसाठी प्राण पणाला लावून भूदल, नौदल आणि वायुसेनेतील जवान सेवा करतात. देशावर कुठल्याही आतंकवादी दृष्ट प्रवृत्तींना चोख प्रत्त्युत्तर देण्यासाठी आपले जवान सदैव सज्ज असतात. या जवानांच्या समर्पित सेवेमुळेच देश सुरक्षित आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी काढले.’मिशन सिंदूर’च्या यशानंतर भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ बल्लारपूर शहरात सात किलोमिटर लांब तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेच्या शुभारंभाप्रसंगी आ.सुधीर मुनगंटीवार बोलत होते. बल्लारपूर येथील काटा गेट डब्लूसीएल येथून तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. तिरंगा यात्रेदरम्यान बल्लारपूर शहर ’भारत माता की जय’ आणि ’वंदे मातरम्’ च्या जयघोषाने दुमदुमले. सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी,सर्वधर्मीय समाज बांधव आणि आबालवृद्ध नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बल्लारपूरच्या रस्त्यांवर आज राष्ट्रध्वज तिरंगा हातात घेऊन देशभक्तीचा जनसागर उसळला. काटा गेटपासून सुरू झालेल्या भव्य तिरंगा रॅलीत सर्व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, सर्वधर्मीय बांधव आणि मोठ्या संख्येने आबालवृद्ध नागरिक ‘वंदे मातरम्’ आणि ‘भारत माता की जय’च्या घोषात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. काटा गेट डब्लू.सी.एल येथून सुरुवात झालेली तिरंगा यात्रा महात्मा गांधी चौक-गोल पुलिया- डॉ आंबेडकर चौक मार्गे नवीन मुख्य बसस्थानक येथे पोहोचली व येथे यात्रेचे समापन झाले. प्रारंभी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. हातात राष्ट्रध्वज, घोषणांनी आसमंत दुमदुमवणारे तरुण, महिलांची सक्रिय उपस्थिती, विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग हे या यात्रेचे विशेष आकर्षण ठरले. ’भारत माता की जय’, ’वंदे मातरम्’, ’जय जवान’ अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. तिरंगा यात्रेच्या माध्यमातून नागरिकांनी देशभक्तीचे दर्शन घडवले. लहानग्यांपासून तर वृद्धांपर्यंत प्रत्येकाने या यात्रेत सहभाग घेतला. ही फक्त यात्रा नव्हे, तर आपल्या शुरवीर भारतीय सैनिकांप्रती कृतज्ञता आहे . देशासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या प्रत्येक सैनिकांच्या पाठिशी संपूर्ण देश खंबीरपणे उभा आहे, याची प्रचिती तिरंगा यात्रा देते, असेही यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

### माजी सैनिकांचा सत्कार

पांडुरंग हेमके, वीर पत्नी संगीता इंगळे, सहदेव रामटेके, माजी सैनिक विजय शेंडे, मनोज ठेंगणे, हवालदार वीर बहादुर सिंग, जगदीश सिंग,मनोज यादव, विश्वेश्वर सरोज, जन बहादुर सिंग सरोज आदी माजी सैनिकांचा सत्कार आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आला.

### सर्वधर्मीय गुरूंचा सत्कार

भंतेजी भागीरथ, अल्ताफ भाई, मनीषजी महाराज, सादिक जवेरी, सुनील पास्टर, दलजीत सिंह कलसी आदी सर्व धर्मीय गुरुंचा सत्कार आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आला.






# युवकांमध्ये नेतृत्व घडवणे हाच युवासेनेचा खरा उद्देश-जिल्हाप्रमुख आलेख रट्टे

## शिवसेना युवासेनेच्या संघटन विस्तार मोहिमेला गती; गुरुनगर चिचोळी येथे नवीन शाखेचे उद्घाटन




**भद्रावती । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, युवासेना प्रमुख खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक आणि कार्यकारिणी सदस्य हर्षल शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या संघटन विस्तार मोहिमेअंतर्गत भद्रावती शहरातील गुरुनगर चिचोळी येथे युवासेनेच्या नव्या शाखेची भर पडली आहे.

या शाखेचा उद्घाटन सोहळा युवासेना जिल्हाप्रमुख आलेख रट्टे यांच्या हस्ते पार पडला. उद्घाटनानंतर झालेल्या छोटेखानी सभेत मार्गदर्शन करताना आलेख रट्टे यांनी सांगितले, युवासेना ही केवळ संघटना नसून युवकांमधील नेतृत्वगुणांना दिशा देणारी चळवळ आहे. गावागावांतील युवकांना एकत्र करून त्यांच्यामध्ये सामाजिक भान निर्माण करणं, हेच आमचं ध्येय आहे. गुरुनगर चिचोळी येथील शाखा म्हणजे त्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहे.

या वेळी युवासेना तालुका संघटक सोनू बोनागिरी, वरोरा-भद्रावती समन्वयक मुनेश्वर बदखल, शाखा प्रमुख राज रायपुरे, उपशाखा प्रमुख रोहित सोना, शाखा सचिव साहिल तलसे, तसेच यश चेट्टी, ललित चिमुरकर, ऋषिकेश नंदिनूरू, सचिन गावंडे, सुमित हस्तक आणि इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंद्रपूरमध्ये तेंदूपत्ता संकलकांसाठी सुरक्षिततेचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात सध्या तेंदूपत्ता हंगाम जोरात सुरु आहे. ब्रम्हपुरी, मध्य चांदा, चंद्रपूर व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प या भागांतील वनक्षेत्रांमध्ये ७० पैकी ७५ तेंदूपत्ता घटकांमध्ये संकलन कार्य सुरू आहे. या हंगामातून सुमारे ३५ हजारांहून अधिक कुटुंबांना रोजगार मिळतो.

परंतु, जिल्ह्यातील वनक्षेत्रांमध्ये वाघांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्यामुळे संकलन करताना खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. याअगोदरच मे महिन्यात वाघाच्या हल्ल्यांमुळे ७ व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, त्यामुळे चंद्रपूर वनविभागाकडून तेंदूपत्ता संकलकांना सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजना काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी सांगितले की, वाघाच्या अधिवास असलेल्या वनक्षेत्रात जाणे टाळावे. संकलन केवळ जवळच्या गावांतील लोकांनी करावे आणि तेही समूहाने, एकट्याने जंगलात न जाण्याचा सल्ला दिला आहे. सकाळी ८ वाजता पूर्वी जंगलात प्रवेश करू नये, तसेच संध्याकाळी ५ वाजता पूर्वी बाहेर यावे.संकलन करताना पुरवण्यात आलेला मानवी मुखवटा डोक्याच्या मागील भागात नीट घालावा. वनविभागाचे कर्मचारी, अग्निशमन कर्मचारी व प्राथमिक बचाव दल सतत संकलकांवर लक्ष ठेवतील आणि वाघाचा वावर आढळल्यास तत्काळ सतर्क करतील. वाघाची चाहूल लागल्यास त्वरित मागे फिरून वनविभागाला माहिती द्यावी, असे देखील सांगितले गेले.या खबरदारीच्या उपाययोजना पाळूनच तेंदूपत्ता संकलन करावे, जेणेकरून संकलक आणि त्यांचे कुटुंब सुरक्षित राहतील, असा आग्रह वनविभागाने व्यक्त केला आहे.

# कॅम्लीन कंपनीत वायूगळती; ११ कामगारांना त्रास

**पालघर । प्रतिनिधी**

तारापूर औद्योगिक वसाहतीतील कॅम्लीन फाईन सायन्सेस लिमिटेड या कंपनीत रविवारी पहाटे वायूगळती झाली. या घटनेत ११ कामगारांना डोळ्यांत जळजळ, श्वास घेण्यास त्रास अशा तक्रारी निर्माण झाल्या असून त्यांना उपचारासाठी बोईसर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डायमिथाईल सल्फेट (ऊ्वड) या रसायनाचे ट्रान्स्फर सुरू असताना पहाटे तीनच्या सुमारास वायूगळती झाली. सुरुवातीला दोन जणांना त्रास जाणवला, मात्र खबरदारी म्हणून आणखी ९ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

जखमी कामगारांमध्ये अबू बकर, केतन म्हात्रे, नरेंद्र ठाकूर, अभिषेक देव, मंगल यादव, सुनील पाटील, मनीष यादव, जितेंद्र चौधरी, मनीष कुमार, आशिष देशमुख आणि विजय पाल यांचा समावेश आहे.घटनेनंतर पोलीस व औद्योगिक आरोग्य विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. सहाय्यक संचालक एस. जी. सब्बन यांनी प्राथमिक चौकशी केली असून, सखोल तपास सुरू आहे. पर्यावरण व सुरक्षेच्या दृष्टीने ही घटना गंभीर मानली जात आहे.

# सुंदर ब्रह्मपुरी शहराचे' स्वप्न साकारण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील-विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार

## शहराचे रूपडे पालटणार-४३ कोटींच्या विकास निधीतून तलाव व बाजाराचे सौंदर्यकरण

**ब्रम्हपुरी । प्रतिनिधी**

मी लोकप्रतिनिधी होण्यापूर्वी मागील दहा वर्षाच्या काळात ब्रह्मपुरी शहरासह संपूर्ण विधानसभा क्षेत्र विकासात्मक दृष्ट्या मागासलेला होता. तसेच विरोधी बाकावर बसून मी माझ्या अनुभवाच्या बळावर कोट्यावधींचा विकास निधी खेचून आणला. त्याचे आज फलित म्हणून संपूर्ण विधानसभा क्षेत्राचा झपाट्याने विकास होत असून शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रह्मपुरी शहराला भरघोस विकास निधीतून सुंदर शहर म्हणून ओळखल्या जाणार असून मी या शहरासह संपूर्ण विधानसभा क्षेत्राच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहील. असे प्रतिपादन राज्याचे लोकलेखा समिती अध्यक्ष तथा विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रह्मपुरी येथे नुकताच संपन्न झालेल्या ४३ कोटींच्या विकास कामांच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.






आयोजित भूमिपूजन सोहळ्यास प्रामुख्याने प्रमुख उपस्थिती म्हणून चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान, काँग्रेस ,ज्येष्ठ नेते डॉ. देविदास जगनाडे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी सभापती डॉ. राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी नगरसेवक हितेंद्र राऊत, न.प.माजी उपाध्यक्ष अशोक रामटेके, प्रशांत उराडे,मुख्याधिकारी अर्शिया जुही, माजी न.प.उपाध्यक्ष बंटी श्रीवास्तव, माजी नगरसेवक महेश भर्रे, प्रितीश बुरले, माजी नगरसेवक सागर आमले,माजी नगराध्यक्षा वनिता ठाकूर, माजी नगराध्यक्षा योगिता बनपुरकर, महीला काँग्रेसच्या शहराध्यक्षा योगिता आमले, कृउबा उपसभापती सुनीता तिडके, माजी नगरसेविका अंजली उरकुडे यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना विधिमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ता येत असते सत्ता जात असते कुणाचीही सत्ता कायमस्वरूपी टिकून राहत नाही. मात्र तुमच्या आशीर्वाद रुपी बळाच्या जोरावर विरोधी बाकावरूनही मी प्रचंड निधी खेचून आणला. आज या संपूर्ण विधानसभा क्षेत्रात सह ब्रह्मपुरी शहरात झालेल्या विकास कामांचे तुम्ही साक्षीदार आहात. शहरातील जुन्या तलावांचे सौंदर्यकरण व आठवडी बाजाराचे नूतनीकरण यातून नागरिकांना विशेष सोयीसुविधासह निसर्गरम्य वातावरणाच्या सानिध्यात मनसोक्त आनंद लुटण्याचा विरंगुळा लाभणार असून शहरातील आबाल वृद्ध नागरिकांसह इतर शहरातील नागरिक देखील याचा आस्वाद घेऊ शकणार. शहराच्या विकासाला काही विघ्न संतोषी कडून अडथळा निर्माण होत आहे. त्यांना शहराच्या सर्वांगीण विकासाचे चित्र डोळ्यात खूपते आहे .त्यांच्या कसा बंदोबस्त करायचा यावरही माझ्याकडे उपाय योजना आहेत असेही ते यावेळी आवर्जून म्हणाले. मार्गदर्शनपर बोलताना चिमूर-गडचिरोली क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान म्हणाले की, सत्तेतील केंद्र व राज्य सरकारकडून निधी वाटपात दुजाभाव केला जातो. तसेच निधी मिळविण्यासाठी विविध किचकट प्रक्रियांना सामोरे जावे लागते. मात्र विधिमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांची आक्रमक शैली व विकासात्मक दूरदृष्टीकोण व कार्यपद्धती यापुढे विरोधकांना विकास निधी देण्यास भाग पडावे लागत असून तुम्हाला लाभलेले क्षेत्र प्रतिनिधी एक कर्तृत्ववान लोकप्रतिनिधी असल्याचे ते यावेळी म्हणाले. तत्पूर्वी ब्रह्मपुरी शहराती नगरपरिषद अंतर्गत केंद्रशासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत बोडीचे सौंदर्यीकरण (जलतरण तलावाजवळ) १२.२७ कोटी, आठवडी बाजार सौंदर्यीकरण (बाजार चौक) १०.७१ कोटी लेंढारा तलाव सौंदर्यीकरण १९.६६ कोटी अशा एकूण ४३ कोटींच्या विकास कामांचा भूमिपूजन सोहळा थाटात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी अर्शिया जुही सुत्रसंचलन इंजी.मंगेश बोंद्रे यांनी केले.तर आभार इंजी. अविनाश यांनी मानले. आयोजित भूमिपूजन सोहळा कार्यक्रमास काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# शेगाव शिवारात अवैध रेती वाहतूक करणारे वाहन तहसील पथकाने जप्त

## चालक व मालकाने कारवाईत अडथळा आणत वाहन पळवले

**वरोरा । प्रतिनिधी**

तहसील कार्यालय वरोराच्या पथकाने शेगाव बु. गाव शिवारात अवैधरीत्या एक ब्रास रेती वाहतूक करणारे वाहन आज पकडले. मात्र, कारवाईदरम्यान वाहनचालक व मालकाने प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण करत जप्त वाहन पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली.प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तहसील पथकाने अवैध रेती वाहतूक करणारे वाहन ताब्यात घेतले. वाहन शेगाव पोलिस स्टेशनमध्ये जमा करण्यासाठी नेत असताना वाहन चालक मनोज उर्फ भूषण बंडू रणदिवे आणि वाहन मालक प्रणय लोणकर यांनी कारवाईत अडथळा आणला व ताब्यात घेतलेले वाहन पळवून नेले.



या प्रकारामुळे महसूल व पोलिस प्रशासनात खळबळ उडाली असून, वरील दोघांविरुद्ध शेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसील कार्यालयाकडूनही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे.अवैध रेती उपशामुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होत असतानाच, कारवाईत अडथळा आणणे ही गंभीर बाब मानली जात आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस व महसूल प्रशासनाकडून सुरू आहे.

# वाघाच्या हल्ल्यात भादुर्णी शिवापूर चक येथील शेतकरी ठार

## शरीराचे अर्धवट अवशेष सापडले; गावकऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण

**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यात वाघाच्या हल्ल्यांची मालिका सुरूच असून, पुन्हा एकदा एका शेतकऱ्याचा बळी गेला आहे. शनिवार, १७ मे २०२५ रोजी भादुर्णी शिवापूर चक येथील शेतकरी ऋषी शिंगाजी पेंदोर (वय ६३) यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला.श्री. पेंदोर हे शनिवारी सकाळी आपल्या बकऱ्यांसाठी चारा आणण्यासाठी मौजा शिवापूर चक येथील जंगलात गेले होते. मात्र रात्रीपर्यंत घरी न परतल्याने गावकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं. वनविभाग बफर युनिटला याबाबत माहिती मिळाल्यानंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली.



दुसऱ्या दिवशी, म्हणजे रविवारी सकाळी १० वाजता जंगलात त्यांचा मृतदेह आढळून आला. वाघाने हल्ला करत शरीराचा बराचसा भाग फस्त केल्याचं आढळलं असून, फक्त डोके शिल्लक असल्याचं वनविभागाच्या तपासात स्पष्ट झालं.ही घटना सिंचाई विभागाच्या नहराजवळ घडली असून, त्यामुळे परिसरात दहशतीचं वातावरण पसरलं आहे. मृतक पेंदोर यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी कारेकर आणि त्यांची टीम तसेच पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. उरलेले अवशेष शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.दरवर्षी तेंदूपत्ता हंगाम सुरू झाला की अशा घटना वाढत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. वाघांचा बंदोबस्त करण्यात वनविभाग अपयशी ठरत असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

# वरोऱ्यात महसूल विभागाची धडाकेबाज कारवाई! टिपले बोडी परिसरातून तब्बल ६० ब्रास अवैध रेती जप्त

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोऱ्यातील मौजा टिपले बोडी परिसरात महसूल विभागाने आज (१८ मे) पहाटेच्या सुमारास मोठी कारवाई करत सुमारे ५० ते ६० ब्रास अवैध रेतीचा साठा जप्त केला. सदर रेती साठा घरकुल लाभार्थ्यांना वाटप करण्यासाठी तहसील कार्यालयात जमा करण्याची प्रक्रिया वेगात सुरू आहे.या कारवाईत नायब तहसीलदार उल्हास लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रद्धा जिल्हेकर (तलाठी वरोरा), स्वप्निल तिकुडवे (तलाठी वनोजा), व पवन चिंचुलकर (तलाठी सोईट) यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून महत्त्वाची भूमिका बजावली.



अवैध रेती साठ्यांविरोधात प्रशासनाने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. वाळू माफियांना धडा शिकवण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून, भविष्यात अशीच कारवाई पुन्हा-पुन्हा करण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून मिळाले आहेत.

# खा.प्रतिभाताई धानोरकर यांच्या प्रयत्नांना यश

## गडचांदूर-नगराळा-येल्लापूर बस सेवा पूर्ववत सुरू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गडचांदूरवरून पहाडावर जाण्यासाठी नगराळा मार्गे राजुरा-गडचांदूर-येल्लापूर ही एसटी बस गेल्या सव्वा महिन्यांपासून बंद असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. विद्यार्थी, शेतकरी, कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिकांना गडचांदूर येथे रस्त्यावर रात्र काढावी लागत होती. या गंभीर समस्येची दखल घेत खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी तातडीने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, चंद्रपूर यांच्याकडे पाठपुरावा केला.



खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाला पत्र क्र. १७९४/२०२५ द्वारे निवेदन दिले होते. या निवेदनात त्यांनी गडचांदूर-नगराळा-येल्लापूर-जिवती ही महत्त्वपूर्ण बस सेवा तसेच गडचांदूर येथून जिवती मार्गे धावणाऱ्या सर्व बंद बस सेवा तात्काळ पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली होती. तसेच या बससेवेमुळे परिसरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे जिवती येथे झालेल्या आढावा बैठकीत नगरीकणी खासदार प्रतिभाताई धानोरकर यांना सांगितले होते. खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या मागणीची तातडीने दखल घेत राजुरा आगार प्रमुख राकेश बोधे यांनी त्वरित कार्यवाही करत बंद असलेली गडचांदूर-नगराळा-येल्लापूर बस सेवा आजपासून पूर्ववत सुरू केली आहे. यामुळे आता या मार्गावरील शेकडो प्रवाशांना पूर्वीप्रमाणे एसटी बसचा मोठा आधार मिळाला आहे.

# टॅलेंटेड गायिकेचं अवघ्या ४४ व्या वर्षी निधन

**चंद्रपूर । वृत्तसेवा**

संगीत विश्वातून एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. एका प्रसिद्ध आणि लोकप्रिय गायिकेचं निधन झालं आहे. गायिकेच्या निधनानंतर कुटुंबासोबतच चाहत्यांवर देखील दु:खाचा डोंगर कोसळला आहे. आसामी गायिका गायत्री हजारिका यांच्या निधनाची बातमी समोर आली आहे. आपल्या गोड आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करणारी गायिकाचं निधन एका गंभीर आजाराने झाल्याची माहिती देखील समोर येत आहे. तिच्या मृत्यूचे कारण कोलन कर्करोग असल्याचे सांगितले जात आहे.गायत्री हिने आतापर्यंत अनेक गाणी गायली आहे. पण दोन गाण्यांमुळे तिच्या करीयरला एक वेगळी दिशा मिळाली. ज़ोरा पाटे पाटे फागुन नामे आणि रति रति मोर ज़ून या दोन गाण्यांमुळे गायत्री यांच्या प्रसिद्धी आणि लोकप्रियतेत मोठी वाढ झाली.गायत्री बऱ्याच काळापासून कोलन कर्करोगाशी झुंजत होती. गायिकेवर उपचार देखील सुरु होते. गुवाहाटीतील नेमकेअर रुग्णालयात उपचार सुरु असताना गायिकेने अखेरचा श्वास घेतला. गायत्रीचे संगोपन आसाममध्ये झाले, त्यामुळे ती तेथील लोकांना आवडती होती. ती मुख्य गायिका आणि लाईव्ह परफॉर्मर होती.गायत्रीच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर चाहत्यांना मोठा धक्का बसला.

# संतांच्या प्रेरणेने समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा-विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार

## सिंदेवाही येथे संत नगाजी महाराज व संत सेना महाराज मूर्ती प्रतिष्ठापना व पुण्यस्मरण सोहळा

**सिंदेवाही । प्रतिनिधी**

सत्तेतील मनुवादी विचारधारेने बहुजनांच्या हक्क हिरावण्यासाठी आरक्षण संपविण्याचा डाव रचला असून शासकीय नोकऱ्या मधे बहुजन तरुणांना तरुणींना संधी मिळू नये याकरिता खाजगीकरणाचा अवलंब केला आहे. अशा विपरीत परिस्थितीत आपण आपल्या पाल्याला उच्चशिक्षित करून संघर्षासाठी उभे करावे. तर समाजाच्या थोर संतांनी दिलेल्या प्रेरणेतून समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन लोकलेखा समिती अध्यक्ष तथा विधीमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी केले. ते सिंदेवाही येथे नाभिक समाज मंडळाद्वारे आयोजित संत नगाजी महाराज व संत सेना महाराज मूर्ती प्रतिष्ठापना व पुण्यस्मरण सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

आयोजित सोहळ्यास चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान, डॉ. देविदास जगनाडे, नाभिक समाज मंडळाचे जेष्ठ मार्गदर्शक प्रभाकरराव फुलबांधे, नगराध्यक्ष भास्कर नन्नावार,माजी नगराध्यक्ष स्वप्निल कावळे, प्रदेशाध्यक्ष रवी बेलपत्रे, कल्याणजी दळे, हितेंद्र राऊत प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना विधिमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, प्रत्येक समाजातील तरुण तरुणींनी उच्चशिक्षित होऊन संघर्षाच्या या काळात समाजाला विकासाभिमुख उंबरठ्यावर आणण्याकरिता प्रयत्नशील असणे काळाची गरज आहे. अलीकडल्या




काळात बहुजन विद्यार्थ्यांना डावलण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून प्रयत्न केला जात आहे. आपल्या समाजाच्या संतांनी दिलेल्या थोर शिकवणीतून संस्कार घेऊन आपण शिक्षित झाले पाहिजेत. समाजातील प्रत्येक व्यक्तीने जबाबदारीने कर्तव्य पार पाडल्यास समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल. तर होतकरू विद्यार्थ्यांना मी सर्वतोपरी मदत करणार अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. मार्गदर्शनपर बोलताना चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान म्हणाले की, देशात जातीय जनगणना न झाल्यामुळे अनेक समाजाचे प्रश्न प्रलंबित आहे. या प्रश्नांना घेऊन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संपूर्ण देशभर भ्रमण करीत सत्ताधाऱ्यांपुढे जनगणनेची मागणी मांडली. या मागणीला अनुसरून सरकार झुकले असून आता जनगणना होणार असल्याची आश्वासन सरकारने दिली आहे. मात्र आपण समाजाला स्वयंभू करणे हेतू सतत प्रयत्नशील राहावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप फुलबांधे तर आभार रितेश घुमे यांनी मानले. आयोजित कार्यक्रमास विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाबरोबर सुसंस्कार आवश्यक–आमदार राजेश बकाने

**पुलगाव । प्रतिनिधी**
सध्याचे युग तंत्रज्ञानाचे आहे. परंतु तंत्रज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कारांचीही निर्मिती होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आमदार राजेश बकाने यांनी केले. ते डी. के. ले-आऊट येथील ध्यान प्रार्थना मंदिरात आयोजित श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते. हे शिबिर श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.बकाने पुढे म्हणाले, तंत्रज्ञानामुळे अद्ययावत माहिती उपलब्ध होते, ती वैयक्तिक प्रगतीसाठी उपयुक्त असते. मात्र संस्कारांची जोड नसल्यास हे ज्ञान अपूर्ण राहते. श्री गुरुदेव सेवा मंडळाने घेतलेली संस्कारांची ही दिशा निश्चितच स्तुत्य आहे.

१२ ते १८ वर्षे वयोगटातील ७२ मुलामुलींनी या शिबिरात सहभाग घेतला. शिबिरात स्वच्छता, ध्यान, प्रार्थना, ग्रामगीता वाचन, योगासने, बौद्धिक सत्र, लेझीम, कराटे, मल्लखांब, खंजिरी भजन आणि विविध मैदानी खेळ यांचे प्रशिक्षण दिले गेले. समारोपप्रसंगी सामूहिक प्रार्थना घेण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामगीताचार्य सुरेश मस्के होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राजेश बकाने आणि पत्रकार अविनाश भोपे उपस्थित होते. यावेळी अविनाश भोपे यांनी प्राणायाम, योग व संस्कारांचे महत्त्व विषद केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष हिरामण भाजीपाले यांनी केले. त्यांनी शिबिराची पार्श्वभूमी स्पष्ट करत विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची गरज अधोरेखित केली.शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना वंदनीय राष्ट्रसंत साहित्याची प्रशस्तिपत्रके देण्यात आली. शिक्षक प्रफुल्ल सावंत व प्रमोद परटक्के यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आयोजन यशस्वी होण्यासाठी जावरकर, भिलकर, बहादूरकर, लता भाजीपाले, सरोज राजकुंवर यांनी सहकार्य केले.सूत्रसंचालन पारुल ढाले व अक्षरा मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रमोद जावरकर यांनी केले. यावेळी शिबिरातील गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.



# योगेश पुरोहित यांना राज्यस्तरीय ‘श्री गुरुदेव जीवन गौरव पुरस्कार’

**पुलगाव । प्रतिनिधी**
आर्ट ऑफ लिविंगचे संस्थापक पूजनीय श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली योग, प्राणायाम व तणावमुक्त जीवनशैलीचा प्रसार करणारे योगेश पुरोहित गेली १२ वर्षे वर्धा जिल्हा व पुलगाव परिसरात सातत्याने सेवा देत आहेत. त्यांनी रक्तदान शिबिरे आयोजित केली असून, ‘नेत्रमित्र परिवार’च्या माध्यमातून मरणोत्तर नेत्रदानाच्या जनजागृतीसाठीही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.



सन १९९८ पासून ते आर्ट ऑफ लिविंगच्या माध्यमातून सुमारे १०,००० नागरिकांना तणावमुक्त, व्यसनमुक्त जीवन जगण्याचे प्रशिक्षण देऊन समाज उभारणीत आपले योगदान देत आहेत.या उल्लेखनीय कार्याची दखल घेत डॉ. संजय आदमने (अध्यक्ष, पद्मश्री फाउंडेशन, नागपूर) व समन्वयक प्रमोद भोंगे (ग्रामगीताचार्य, उपसेवाधिकारी, वर्धा जिल्हा) यांच्या हस्ते योगेश पुरोहित यांना राज्यस्तरीय ‘श्री गुरुदेव जीवन गौरव पुरस्कार’ १८ मे रोजी अयांश सभागृह, पुलगाव येथे प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या आयोजनात आर्ट ऑफ लिविंगचे सदस्य किशोर कल्पे, अवधूत मोने, मुन्ना खुराना, अतुल साळवे, रवी राठोड, विनायक लिमजे, श्याम जुनघरे, संगीता शाम जुनघरे, शिल्पा होले, कल्पना बिरे, डिंपल खुराना, पुष्पा सरगर आणि प्रणिता मोने यांनी सक्रिय सहभाग घेतला. उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी योगेश पुरोहित यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

# हिवरा (हा) येथे मातोश्री गौतमी बुध्द विहाराचे लोकार्पण




**हिवरा (हा) । प्रतिनिधी**
स्थानिक हिवरा (हा) येथे मातोश्री रमाई बुध्द विहाराचे लोकार्पण लोकप्रिय आमदार मा. राजुभाऊ बकाने यांच्या हस्ते पार पडले. बरेच दिवसांपासुन हिवरावासियांची परिसरात एक सुंदर बुध्द विहार असावे अशी मागणी होती परंतू नीधीअभावी ही मागणी मान्य होऊ शकली नाही जेव्हा सौ वैशालीताई येरावार यांना हा विषय कळला तेव्हा त्यांनी याला प्राधान्य देत हा विषय लवकरच मार्गी लावण्याचे वचन स्थानिकांना दिले व माजी राज्यमंत्री सन्माननिय मदनजी येरावार यांनी आपल्या राखिव निधीतून निधी ऊपलब्ध करुन दिला व सदर विषय मार्गी लागला यामुळे हिवरावासियांचे स्वप्न पुर्ण झाले. याच लोकार्पण सोहळयाच्या वेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखिल मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमाला ऊदघाटक मा आमदार श्री राजुभाऊ बकाने,अध्यक्ष स्थानी माजी. जि.प. ऊपाध्यक्षा सौ वैशालीताई येरावार तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन यावेळी माजी. जि.प. ऊपाध्यक्षा सो वैशालीताई येरावार ,सोनेगाव (आ) देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष मा. जयंतभाऊ येरावार, ओ.बि.सी. समाज अध्यक्ष संजयजी गाते पुलगाव पो.स्टे. चे ठाणेदार श्री राहुलजी सोनवने, ऊद्योजक श्री प्रविण नांदे, तसेच अनील परसगाये, देवानंद सावरकर,गणेश पवार,मित गोसर,सचिन खटोले,हनुमान कात्रे,गजानन हत्तीमारे,प्रदिप जुमडे,रामरावजी भोयर,प्रशांत खोब्रागडे,संदिप भगत, संगीता भोयर, वैशाली नांदे, वनमाला केवटे, पल्लवी काकडे, वैष्णवी काकडे,पुनम गजभिये, अर्चना वानखेडे व सर्व ग्रामस्थ ऊपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन सागर पेरके यांनी तर आभारप्रदर्शन राहुल गजभिये यांनी केले.

# मार्शल आर्ट कराटे ट्रेनिंग सेंटर, सालोड तर्फे साहिल वाघ यांचा भव्य सत्कार

## आत्मरक्षणासाठी मुलींनी कराटे प्रशिक्षण घ्यावे–आशिष कुचेवार

## निशुल्क शिबिरात १०० मुला–मुलींचा उत्स्फूर्त सहभाग

**सालोड (हि) । प्रतिनिधी**
कराटे मार्शल आर्ट ट्रेनिंग सेंटर शाखा, सालोड यांच्या वतीने आयोजित निशुल्क प्रशिक्षण शिबिरात राष्ट्रीय नान चाकू चॅम्पियनशिप स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून एशियन स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या साहिल वाघ याचा भव्य सत्कार करण्यात आला.हा सत्कार उपसरपंच आशिष कुचेवार आणि सेंटरचे संचालक संजिव उर्फ बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आशिष कुचेवार, तर प्रमुख अतिथी म्हणून कौशी उल्हास वाघ, प्रशिक्षक संजय वाघ, अरविंद कन्नाके आदी मान्यवर उपस्थित होते.



शिबिरार्थ्यांना संबोधित करताना आशिष कुचेवार म्हणाले, कराटे हे केवळ खेळ नसून आत्मविश्वास, शिस्त व व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे. विशेषतः आजच्या काळात मुलींनी आत्मरक्षणासाठी अशा प्रशिक्षणांचा लाभ घेणे गरजेचे आहे. साहिल वाघने केलेली कामगिरी वर्धा जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.गेल्या १५ दिवसांपासून सालोड येथे सुरू असलेल्या एक महिन्याच्या मोफत कराटे प्रशिक्षण शिबिरात १०० मुला-मुलींनी सहभाग घेतला आहे. संजिव उर्फ बाळासाहेब वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिरात कराटे, लाठीकाठी, व्यक्तिमत्त्व विकास आणि बालसंस्कार यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. गावात या उपक्रमाबद्दल उत्साह आणि गौरव व्यक्त केला जात आहे.सत्कार समारंभास गावातील नागरिक, महिला, युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. साहिल वाघच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# तांदळी गावाजवळ चार चाकी वाहनाच्या धडकेत शेतकऱ्याचा मृत्यू; गुन्हा नोंद

**शिरूर । रमेश बनसोडे**
शिरूर (ता. १८ मे) – शिरूर तालुक्यातील तांदळी गावाच्या हद्दीत एका भरधाव वेगात आलेल्या चारचाकी वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर आरोपीविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सतीश दिलीप शिंदे (वय ३८, व्यवसाय शेती, रा. इनामगाव, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, महेश शिवाजी तावले (रा. श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) या आरोपीने महिंद्रा कंपनीची चारचाकी (वाहन क्रमांक चक१४ऋ-८६२४) भरधाव व अति वेगाने चालवत ताब्यातील बजाज सीटी ११० एक्स दुचाकी (क्रमांक चक१२ढझ४०८१) ला पाठीमागून जोरदार धडक दिली.

या अपघातात दुचाकीस्वार दिलीप दगडू शिंदे (वय ५० वर्षे) यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघातामुळे



दुचाकीला मोठे नुकसान झाले आहे.फिर्यादी सतीश शिंदे हे मयत दिलीप शिंदे यांचे पुत्र असून, त्यांनी आरोपीविरुद्ध योग्य कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्र. ३३८/२०२५ अंतर्गत भारतीय दंड विधान कलम १८६(१), १२५(अ)(ब), २८१, ३२४(४) तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४, १३४/१७७ यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा नोंद पोलीस नाईक बनकर यांनी नोंदवला असून, पुढील तपास पोलीस नाईक गवळी करत आहेत. पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.या दुःखद घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

# देवळी शहरात निघाली ‘भारत शौर्य तिरंगा यात्रा’ भारतीय सेनेच्या शौर्याला देवळीकरांचा सलाम

## भारत माता की जय, वंदे मातरम् च्या घोषणांनी दुमदुमला संपूर्ण शहर

**देवळी । प्रतिनिधी**
गेल्या महिन्यात जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांवर पाकपुरस्कृत अतिरेक्यांनी भ्याड हल्ला केला. या अमानुष घटनेत २६ निष्पाप नागरिकांची त्यांच्या कुटुंबियांसमोर निर्घृण हत्या करण्यात आली. याला चोख प्रत्युत्तर देताना भारतीय सैन्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत पाकिस्तानातील ९ हवाई तळ उद्ध्वस्त केले आणि १०० पेक्षा अधिक अतिरेक्यांचा खात्मा केला.भारतीय सैन्याच्या या पराक्रमाला मानवंदना देण्यासाठी देवळी शहरात रविवारी सकाळी १० वाजता ’भारत शौर्य तिरंगा यात्रा’ आयोजित करण्यात आली. भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. ही यात्रा रामदासजी तडस आय.टी.आय. येथून सुरू होऊन मिरनाय मंदिर, कामडी चौक, गांधी चौक, ठाकरे पुतळा, आठवडी बाजार मार्गे जाऊन शहीद अशोक गेडाम स्मारकाजवळ समारोप करण्यात आला.



या यात्रेत माजी खासदार रामदास तडस, आमदार राजेश बकाने, कॅप्टन मोहन गुजरकर, भाजपा महामंत्री राहुल चोपडा, माजी नगराध्यक्ष शोभा तडस, सुचिता मडावी, प्रा. नरेंद्र मदनकर, दिलीप कारोटकर, नंदू वैद्य यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी माजी सैनिक मारोतराव कापसे, वामनराव कुर्जेकर, गुलाब जामुनकर, वासुदेव भजपुजे, सुरेश रेवतकर आणि हरिभाऊ खोंड यांचा शाल, श्रीफळ आणि सत्काराने गौरव करण्यात आला.माजी खासदार रामदास तडस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भारतीय सैन्य आतंकवाद समूळ नष्ट करण्यास सक्षम आहे. नक्षलवाद्यांचा पूर्ण खात्मा होईपर्यंत लढा थांबणार नाही.आमदार राजेश बकाने म्हणाले, आमच्या भगिनींचे सिंदूर पुसणाऱ्यांना ‘ऑपरेशन सिंदूर’ ने गुडघ्यावर आणले. हे केवळ लष्कराचे शौर्य नव्हे, तर राष्ट्राच्या स्वाभिमानाचे प्रतिक आहे.या यात्रेत एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र सैनिक, विश्व हिंदू परिषद-बजरंग दलाचे कार्यकर्ते मोहन जोशी, दिनेश शिरसागर, अनिल शिरसागर, तसेच भाजपा देवळीचे उमेश कामडी, रवी कारोटकर, अंकित टेकाडे, संतोष भोयर, संजय बिजवार, प्रमोद ढोक, शुभांगी पुर्जेकार, संजय भुजबईले, अमोल काकडे यांच्यासह शहरातील युवक, युवती, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शहरात देशभक्तीचे वातावरण तयार करत, भारतीय सेनेच्या शौर्याला देवळीकरांनी दिलेला हा सलाम अविस्मरणीय ठरला.

# शिरूर तालुक्यात ४ लाखांहून अधिक रुपये फसवणुकीचा प्रकार; नऊ आरोपींवर गुन्हा

**शिरूर । रमेश बनसोडे**
आलेगाव पागा येथील शेतकरी शरद लक्ष्मण आसवले यांच्याशी तुमच्या गु-हाळासाठी मजूर उपलब्ध करून देतो असा खोटा विश्वास उत्पन्न करून तब्बल ४ लाख ८८ हजार रुपये फसवणूक केल्याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शरद लक्ष्मण आसवले (वय २८) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ऑगस्ट २०२४ ते ७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत आरोपी कुणाल ताराचंद मालचे (रा. खामखेडा, ता. धरणगाव, जि. जळगाव) यांनी मजूर उपलब्ध करून देण्याचा फसवणूकचा भास करून शरद यांच्याकडून ४ लाख रुपये काढले. या प्रकरणात रामा लक्ष्मण भिल, बापु सदा भिल, शांताराम सोमा भिल, गोरख रामचंद्र भिल, नाना नामदेव भिल, संजय शांताराम भिल, विठोबा पंडीत भिल, संजय सुरसिंग सोनवणे (सर्व रा. वराड बुद्रुक, ता. धरणगाव, जि. जळगाव) यांचा देखील समावेश आहे.आरोपी कुणाल मालचे आणि ईश्वर लक्ष्मण भिल यांनी फिर्यादीकडून प्रत्येकी ५०,००० रुपये अशी एकूण ४ लाख रुपये रोख उचलले. त्याशिवाय, मे २०२४ ते १९ ऑक्टोबर २०२४ दरम्यान १,२८,००० रुपये ऑनलाईन फोन पेद्वारेही घेतले आहेत. या व्यवहारावर ६ सप्टेंबर २०२४ रोजी मौजे एंडोल (ता. एरंडोल, जि. जळगाव) येथे रजिस्ट्री (क्र. १५९२/२०२४) करून आरोपी कुणाल मालचे व ईश्वर भिल यांनी सह्या केल्या होत्या.मात्र, आरोपींनी मजूर पाठवण्याऐवजी घेतलेली रक्कम परत न करतांना फिर्यादीचा विश्वासघात केला आहे. या फसवणुकीसंबंधित गुन्हा क्र. ३४०/२०२५ शिरूर पोलीस स्टेशनमध्ये नोंदवण्यात आला असून तपास पोलीस अंमलदार भोते (क्र. १२५२) करत आहेत.गुन्हा १७ मे २०२५ रोजी रात्री ११:४४ वाजता एन्ट्री क्रमांक ५७/२०२५ म्हणून नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पुलगाव शहरात ‘तिरंगा सन्मान यात्रा’

## भारतीय सैनिकांच्या शौर्याला मानवंदना

**पुलगाव । प्रतिनिधी**
जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी घटनेनंतर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत शत्रुराष्ट्राच्या मनसुब्यांना धक्का दिला. भारतीय सैनिकांच्या या शौर्यपूर्ण कार्याला मानवंदना देण्यासाठी १८ मे रोजी सकाळी ११ वाजता पुलगाव शहरात ’तिरंगा सन्मान यात्रा’ आयोजित करण्यात आली.हातात तिरंगा ध्वज घेऊन भारत माता की जय, वंदे मातरम आणि भारतीय सैनिक अमर रहें अशा राष्ट्रभक्तीपूर्ण घोषणांनी शहराचा मुख्य मार्ग दुमदुमून गेला. यात्रा टिळक चौकात समारोपास आली, जिथे नागरिकांनी राष्ट्रध्वजाला अभिवादन केले.

या यात्रेमध्ये पुलगाव-देवळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांनी




सहभाग नोंदवला. मार्गक्रमणादरम्यान आमदार बकाने यांनी आदर्श भगतसिंग यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. तसेच, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत इंगोले यांनी अभिवादन केले.यात्रेमध्ये भाजपच्या विविध आघाड्यांचे कार्यकर्ते, स्थानिक गणमान्य नागरिक, युवक आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या यात्रेद्वारे पुलगाववासीयांनी देशभक्तीची जाणीव व्यक्त करत भारतीय सैनिकांच्या बलिदानास सलाम केला.

# ५ किलोमीटर लांब तिरंगा रॅली काढत चंद्रपूरकरांनी केला भारतीय सैन्याच्या शौर्याला सलाम

## आ.किशोर जोरगेवार यांच्या संयोजनातून भव्य आयोजन विविध धर्मगुरूंच्या उपस्थितीने विविधतेत एकतेचे दर्शन





**चंद्रपूर । प्रतिनिधी**
ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्याच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीसाठी नागरिक या उपक्रमांतर्गत पाच किलोमीटर लांब तिरंगा रॅली काढून चंद्रपूरकरांनी भारतीय सैन्याच्या शौर्याला आणि बलिदानाला भव्य सलामी दिली. आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून आणि संयोजनातून पार पडलेल्या या ऐतिहासिक उपक्रमाला हजारो नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. यात विविध धर्मीय धर्मगुरूंच्या उपस्थितीमुळे विविधतेत एकतेचे दर्शन घडले.संध्याकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या तिरंगा रॅलीला सुरुवात झाली. त्यानंतर सदर रॅली जय घोषणा देत शहराच्या मुख्य मार्गाने मार्गस्थ झाली. या रॅलीत शहरातील विविध भागांतून तरुण, विद्यार्थी, महिलावर्ग, सामाजिक संस्था, व्यापारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विशाल तिरंगा खांद्यावर घेऊन चालताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अभिमान, देशप्रेम आणि एकतेचा झळाळता प्रकाश दिसत होता.
या रॅलीत विविध धर्मगुरूंच्या उपस्थितीमुळे विविधतेत एकता हा भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र प्रत्यक्ष साकार झाला. हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, ख्रिश्चन, जैन बांधवांनी एकत्र येऊन देशाच्या एकतेचा संदेश दिला. या प्रसंगी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले, भारतीय जवानांच्या बलिदानामुळे आपण शांततेत जगतो. त्यांच्या सन्मानार्थ आपण कृतज्ञतेने झुकतो. ही रॅली केवळ एक कार्यक्रम नसून चंद्रपूर शहराची राष्ट्रभक्तीची आणि एकतेची ताकद जगाला दाखवणारा संदेश आहे.कार्यक्रमात भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान अशा घोषणा देत वातावरण देशभक्तीने भारावले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला, विद्यार्थ्यांनी फलक आणि बॅनरद्वारे देशप्रेमाचे संदेश दिले, तर काही ठिकाणी बॅण्ड पथकाच्या गजरात रॅलीचे स्वागत करण्यात आले. रॅली जटपूरा गेटला वळसा घालून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली. येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीच्या मार्गावर विविध सामाजिक संघटना, व्यापारी वर्गाच्या वतीने पाणी, शीतपेय, फळांचे वाटप करत आपला सहभाग नोंदविला. या रॅलीत जवळपास २०० सामाजिक संघटना आणि पाच हजार देशभक्त नागरिक सहभागी झाले होते.

## अंजनवाडा नगरीत शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर आयोजित-सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, ग्रामपंचायतीकडून आवाहन

**औंढा नागनाथ । प्रतिनिधी**
तालुक्यातील अंजनवाडा गावांमध्ये येत्या २३ मे २०२५ रोजी शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांतर्गत शेतकरी, महिला, विद्यार्थी यांना रहिवाशी, उत्पन्न, जातीचे दाखले तसेच रेशनकार्ड वाटप, सामाजिक लाभ योजना, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना यांसारख्या महसूल विभागाशी संबंधित विविध प्रमाणपत्रांचे वाटप होणार आहे.
याशिवाय, प्रमाणपत्रांशी संबंधित जनतेच्या तक्रारींचा देखील शिबिरात निकाली काढण्यात येईल. या संधीचा लाभ घेण्यासाठी अंजनवाडा गावातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी होण्याचे ग्रामपंचायत कार्यालय अंजनवाडा व गावचे सरपंच किरण भाऊ घोंगडे यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.शिबिराचा लाभ घेऊन आपल्या कागदपत्रांचे दुरुस्तीकरण तसेच सामाजिक योजनांचा लाभ घ्यावा, असे ग्रामपंचायतीकडून नागरिकांना विशेष आवाहन करण्यात येत आहे.

## भाजप कार्यकर्त्याला मारहाण आ.बोरणारे यांच्यावर आरोप

**वैजापूर । प्रतिनिधी**
वैजापूर येथील भाजप कार्यकर्ते कैलास पवार यांनी आमदार रमेश पाटील बोरणारे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे.



पवार यांच्या तक्रारीनुसार, १७ मे रोजी फुलेवाडी येथील त्यांच्या घरासमोर रस्त्याचे काम सुरू होते. यावेळी आमदार बोरणारे, बाबासाहेब जगताप, राजू साळुंके, प्रदीप साळुंके, चालक सचिन साठे आणि नगरपालिकेचे अभियंता शंकर जोरे हे उपस्थित होते.
पवार यांनी ले-आउट पाहूनच रस्त्याचे काम करण्यास सांगितले असता, त्यांच्यावर शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. तसेच, तुला वैजापूरमध्ये राहू देणार नाही, तुला संपवू अशी धमकी दिल्याचे पवार यांनी तक्रारीत म्हटले आहे.या प्रकारामुळे पवार व त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार देण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## अनिल यादवराव तमगिरे यांचे निधन

**पुलगाव । प्रतिनिधी**



येथील हरिराम नगर निवासी अनिल यादवराव तमगिरे(वय ४८) यांचे हृदयविकाराने दिनांक १८ मे २५ ला सकाळी निधन झाले. अत्यंत मृदू व शांत स्वभावाचा अनिल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक होता. तो विजतंत्री, तांत्रिक दुरुस्ती, वाहचालक म्हणून सेवा देत होता. त्याच्या मागे भाऊ, बहीण, पत्नी, दोन मुली व बराच मोठा आप्तपरिवार आहे. अनिलच्या आकस्मिक निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे

## पोटेगाव बांधाऱ्याच्या दुरुस्ती कामाला नदीच्या पाण्याचा अडथळा

**सोलापूर । प्रतिनिधी**
पोटेगाव येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम सध्या पावसामुळे अडथळ्यात आले असून, ओढ्याला आलेल्या पाण्यामुळे बांधकामाचे ठिकाण पाण्याखाली गेले आहे. परिणामी, बंधाऱ्याचे काम तात्पुरते थांबवण्यात आले आहे.पावसामुळे ओढ्याला मोठ्या प्रमाणात पाणी आले असून, उकरलेली चारी, मेन बेसमेंटचा भाग संपूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे काम पुन्हा सुरू करण्यासाठी पाणी ओसरण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे.



दरम्यान, या कामादरम्यान चार मोऱ्या पाडण्यात आल्या असून, त्यावर उभारण्यात आलेला पूल देखील पाडण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रस्त्याने ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या अडथळ्यामुळे ठेकेदाराची अवस्था उल्हास त्यात फाल्गुनी मास अशीच झाली आहे. काम सुरू असतानाच पावसामुळे बंधाऱ्याची रचना आणि वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून, पावसाच्या जोरावर कामाची गती पुन्हा कधी आणि कशी सुरू होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तेंदूपत्ता संकलन करताना वाढोणा येथे वाघाचा हल्ला; ६४ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**
नागभीड तालुक्यातील तळोधी बा वनपरिक्षेत्रातील आलेवाही बीटमध्ये रविवारी (दि. १८) सकाळच्या सुमारास तेंदूपत्ता संकलन करत असलेल्या वृद्धावर वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मारोती नकटु शेंडे (वय ६४, रा. वाढोणा) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
मारोती शेंडे हे त्यांच्या पत्नी कमलबाई शेंडे यांच्यासह तेंदूपत्ता तोडण्यासाठी आलेवाही बीटमधील कक्ष क्रमांक ६९७ मध्ये गेले होते. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला चढवला. त्यांच्या पत्नीच्या



आरडाओरडीनंतर आजूबाजूच्या लोकांनी मदतीसाठी धाव घेतली. आवाज ऐकून वाघाने पळ काढत आवळगावच्या दिशेने झुडपात धूम ठोकली.
घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी वाढोणा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाले. प्राथमिक उपचारांनंतर जखमी शेंडे यांना सिंदेवाही ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.
नागभीड तालुक्यात सध्या तेंदूपत्ता संकलनाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून, वन्यप्राण्यांची वावरही वाढलेली आहे. परिणामी अशा दुर्घटना वारंवार घडत आहेत. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून वाघाचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## छातीत तीन घाव, घरात थरार! पिशोर मधील खून प्रकरणात आरोपी रुग्णालयात



मृतक

**पिशोर । जावेद शेख**
पिशोर येथील झोपडपट्टी भागात शनिवारी (ता. १७) रात्री भीषण खून प्रकरण घडले असून, धारदार शस्त्राने छातीत तीन वेळा वार करून शेख शकील शेख जमील (वय ४०) यांचा निर्घृण खून करण्यात आला. विशेष म्हणजे, हल्लेखोर अलीम सलीम पठाण (वय २५) हा खून करून पसार झाल्यानंतर काही तासांत गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला असून, त्याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक आहे.
या प्रकरणी शकील शेख यांचा सावत्र मुलगा शेख राहील शेख अहमद यांनी पिशोर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास अलीम पठाण हा थेट शकील शेख यांच्या घरात घुसला. यावेळी घरात शकील यांची पत्नी व मुलगा उपस्थित होते. अलीमने पहिल्याच क्षणी धारदार चाकूने शकील यांच्या छातीत घाव घातला. हल्ल्यादरम्यान तक्रारदार राहील व आरोपी यांच्यात झटापट झाली. त्यात अलीमच्या हातातील पहिला चाकू खाली पडला. मात्र त्याने लगेचच दुसरा चाकू काढून पुन्हा वार केले. पत्नी व मुलगा यांनी त्याला मागून आवळून धरले, त्यावेळी दुसऱ्या चाकूचाही ताबा सुटला. तरीही अलीमने तिसरा चाकू काढून तिसऱ्यांदा छातीत वार केला. त्याचवेळी आरडाओरड झाल्याने परिसरातील नागरिक जमा झाले. नागरिकांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता, त्याने हातातील रक्ताने माखलेला चाकू शर्टला पुसून अन्य लोकांना धाक दाखवून घटनास्थळावरून पळ काढला. रात्री उशिरा अलीम पठाण हा गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला तत्काळ छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती अत्यंत नाजूक असल्याची माहिती मिळाली आहे.
प्राथमिक तपासात, पूर्वी झालेल्या वाद, घरगुती कारणे आणि पोलिसांत तक्रार दाखल झाल्याचा राग मनात धरून अलीम पठाणने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर गावात तणाव निर्माण झाल्याने पोलिसांचा दंगा नियंत्रण पथक पाचारण करण्यात आला.उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश कोल्हे, फॉरेन्सिक तज्ज्ञ विजया पाडळे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली व पुरावे जमा केले. रविवारी सकाळी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्यावर स्थानिक कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला.



आरोपी

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .